नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४१ Issue - 341 | वार सोमवार दि. ४ मे २०२६ Blow- Monday Date 4 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## सोलापूर शहरात दिवसाढवळ्या तरुणाची निर्घृणपणे हत्या

### धारदार शस्त्रे आणि दगडाने ठेचून केली हत्या; परिसरात खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर: सोलापुरात रविवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास भर चौकात रस्त्यावर एका तरुणाची निर्घुण हत्या केल्याची घटना घडली आहे. पाच वर्षापूर्वी डुक्कर पालनाच्या व्यवसायात भांडण झाली होती, त्याबाबतची सुनावणी कोर्टात सुरू आहे. याचाच राग मनात धरून रविवारी सोलापूर शहरातील माधव नगर येथील मुख्य रस्त्यावर लाठ्या काठ्या धारदार शस्त्र आणि दगडाने ठेचून एका तरुणाची हत्या करण्यात आली आहे. मारहाण करताना, तोंडावर दगडाने ठेचून मारतानाचे सीसीटीव्ही सोशल मीडियावर वायरल झाले आहेत. सुरेश कृष्णा श्रीराम (वय अंदाजित ४२ वर्षे)असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. वराह पालनाच्या व्यवसायातून पाच वर्षापूर्वी सुरेश श्रीराम जीवे ठार मारण्याचा प्रयत्न झाला होता याबाबतची नोंद सोलापूर शहरातील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. याच केसची सुनावणी सुरू असताना, सुरेशची भर चौकात निर्दयीपणे हत्या करण्यात आली आहे. पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी या खुनाबाबत अधिकृत माहिती दिली आहे. ह्या करतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर आल्याने, त्या आधारे सोलापूर पोलीस संशयित आरोपीचा तपास करत आहेत. प्राथमिक माहितीनुसार एकूण सहा संशयित आरोपी आहेत त्यापैकी पाच आरोपी ना पोलिसांनी ताब्यात घेतले असून आणखीन एक संशयित आरोपी फरार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुरेश श्रीराम याचे वराह पालनाचे व्यवसाय आहे. पाच वर्षापूर्वी वराह पालनाच्या



व्यवसायातून संशयित आरोपी सोबत मयत सुरेश श्रीराम याचे भांडण झाले होते. सुरेश श्रीराम याने डुक्कर पालनाच्या व्यवसायात संशयित आरोपीच्या डुकरांना विष देऊन मारलं आहे, असा आरोप करत पाच वर्षापूर्वी आरोपींनी सुरेश श्रीराम तरुणाचा हाफ मर्डर केला होता. याची नोंद सोलापूर पोलीस ठाण्यात दाखल आहे.या केसची सुनावणी कोर्टात सुरू असून संशयित आरोपींनी ही केस मागे घे, अन्यथा आम्हाला या खटल्यात शिक्षा होईल, तुला सोडणार नाही अशी धमकी दिली होती.

सोलापूर शहरातील सत्तर फूट रोड ते नीलम नगर कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर सुरेश श्रीराम या तरुणाची हत्या करण्यात आली. सहा संशयित आरोपींनी माधव नगर येथे मुख्य चौकात सुरेश श्रीरामवर पाळत ठेवली होती. सुरेश येताच सहा संशयित आरोपी तुटून पडले. भर रस्त्यावर धारदार शस्त्राने लाठ्या काठ्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. जाग्यावरच ठार करण्याच्या उद्देशाने संशयित आरोपींनी सुरेशच्या डोक्यावर दगडाने प्रहार केला. हा रक्तरंजीत खेळ सुरू असताना आजूबाजूची वाहतूक पूर्णपणे थांबली होती. भर चौकात खून होत आहे, एकानेही सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. भर चौकात सुरेश श्रीराम या तरुणाची हत्या झाली. पतीला मारल्याची माहिती मिळताच सुरेशची पत्नी पळत घटनास्थळी आली. रक्ताच्या थारोळ्यात भर रस्त्यावर सुरेशचा मृतदेह पडला होता. सुरेशची पत्नी मृतदेहा बाजूला बसून किंचाळत होती. काळीज पिळटवून टाकणारा दृश्य कॅमेरात कैद झालं आहे. पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिलेल्या माहितीनुसार सहा पैकी पाच संशयितांना ताब्यात घेतले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## दिल्लीत अग्नीतांडव; इमारतीत नऊ जणांचा आगीत होरपळून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दिल्लीच्या विवेक विहार भागातील एका चार मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आज (३ मे) पहाटेच्या सुमारास लागलेल्या या भीषण आगीत आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर अन्य दोघे जण जखमी झाल्याचीही माहिती आहे. एसीमध्ये सॉर्टसर्किट झाल्याने हि आग लागल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सध्या अग्निशमन दलाच्या वतीने आग पूर्णतः विझवण्याचे कार्य सुरु आहे. मात्र या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आज (३ मे) पहाटे ४ वाजताच्या सुमारास इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर हि आग लागली, त्यानंतर आग विझवण्यासाठी आणि बचावकार्य करण्यासाठी अग्निशमन दलाच्या तब्बल १४ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मात्र आगीचे लोट पाहता तोपर्यंत आग इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यापर्यंत पसरल्याचे घटनास्थळी पोहोचल्यावर अधिकाऱ्यांना आढळून आले.

दरम्यान, इमारतीतून डझनहून अधिक लोकांना वाचवण्यात यश आल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलीय. सध्या जखमींना उपचारासाठी गुरुतेग बहादूर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन तासांनंतर, सकाळी ६ वाजेपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सध्या इमारतीचे अनेक भाग जळालेले आणि सर्वात वरच्या मजल्यावरून धूर बाहेर येताना दिसत आहे. पहाटे सुमारे ४ वाजता आग लागल्याचा फोन आला. अग्निशमन दलाच्या गाड्या आणि स्थानिक पोलिसांना तात्काळ घटनास्थळी पाठवण्यात आले. आग नियंत्रणात आणायला सुमारे दोन तास लागले, त्यानंतर शोधमोहीम राबवण्यात आली, अशी माहिती शाहदराचे डीसीपी राजेंद्र प्रसाद मीना यांनी दिली आहे. स्थानिक नगरसेवक पंकज लुथरा यांच्या माहितीनुसार, 'माहिती मिळताच मी घटनास्थळी धाव घेतली. मी नुकताच वरच्या मजल्यांवरून खाली आलो आहे. दुसऱ्या मजल्याच्या मागील भागात पाच मृतदेह आढळले. आणखी एक मृतदेह मागील भागात आणि तीन मृतदेह सर्वात वरच्या मजल्यावर आढळले. सध्या ओळख पटवणे अशक्य आहे.' आम्ही अजूनही पुढील तपास करत आहोत, परंतु डीएनए चाचणी होईपर्यंत आम्ही पीडितांचे ओळख निश्चित करू शकणार नाही. एकूण नऊ मृतदेहांची पुष्टी झाली आहे. आम्ही अजूनही अधिक लोकांचा शोध घेत आहोत. शॉर्ट सर्किटमुळे हे घडले असावे असे लोक म्हणत आहेत, परंतु घटनेच्या नेमक्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

## महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन अध्यक्षपदी मुरलीधर मोहोळ बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या (एमओए) अध्यक्षपदी असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्यानंतर हे पद काही काळ रिक्त होते. राज्याच्या क्रीडा क्षेत्रात मोहोळ यांच्या निवडीमुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष असून या संघटनेच्या म



ाध्यमातून त्यांची महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली होती. गेल्या वर्षी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकांमध्ये मोठे राजकीय नाट्य पाहायला मिळाले होते. त्यावेळी अध्यक्षपदासाठी अजित पवार यांच्या विरोधात मुरलीधर मोहोळ यांनी शड्डू ठोकला होता. मात्र, ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार यांची अध्यक्षपदी तर मुरलीधर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी वर्णी लागली होती. आता अजित पवारांच्या निधनानंतर मोहोळ यांनी या संघटनेची धुरा आपल्या हाती घेतली आहे. अजित पवार यांच्यानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचे नावही या पदासाठी चर्चेत होते. त्यांनी नुकतेच खो-खो असोसिएशनच्या माध्यमातून संघटनेत प्रवेश केल्याने त्यांच्या निवडीच्या शक्यता वर्तवण्यात येत होत्या. पण, पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर अखेर मुरलीधर मोहोळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून मोहोळ यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

## पोहण्याचा मोह आला अंगलट; पुण्यात पवना नदीत तीन तरुणांचा करुण अंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपरी-चिंचवड : उन्हाळ्याच्या सुट्टीचा आणि विकेंडचा आनंद घ्यायला मावळ परिसरात आलेल्या पुण्यातील तीन तरुणांचा पवना नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मावळ तालुक्यातील थूगाव परिसरातील पवना नदी पात्रात घडली. मृतांमध्ये प्रथमेश शिंदे, अश्विन भालेराव आणि आयान शेख यांचा समावेश आहे. आज रविवारची सुट्टी असल्याने हे तिघेही पवना धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. वाढत्या उकाड्यामुळे त्यांनी नदीत पोहण्याचा निर्णय घेतला, मात्र पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तिघेही बुडाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि शिवदुर्ग मित्र मंडळाच्या सदस्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर तिन्ही तरुणांचे पार्थिव बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांनी नदी-नाल्यात पोहताना आवश्यक ती काळजी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

गेल्या दोन दिवसांत मावळ परिसरात एकूण सात जणांचा बुडून मृत्यू झाल्याच्या घटनांनी गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. पवना धरणासह इतर धरण परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या वाढली असताना अशा दुर्घटना सातत्याने घडत आहेत. उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि विकेंडचा



आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात या भागात दाखल होत आहेत. मात्र, पाण्याचा अचूक अंदाज न येणे, खोल पाण्यात उतरणे, तसेच सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे हे जीवघेणे ठरत आहे. प्रशासनाकडून वारंवार सूचना देऊनही काही पर्यटक निष्काळजीपणा करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पवना धरण किंवा इतर जलाशयांमध्ये पोहताना आणि पाण्यात उतरताना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

मावळ तालुक्यात दोन दिवसांत सहा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या दुर्घटना तीन वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असून, कामगार दिनी तीन कामगारांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. जाधववाडी येथे सेल्फी काढण्याच्या नादात तिघे मित्र बुडाले. अजय गारुडे, अनिकेत पवार आणि संतोष येडके (तिघेही रा. भोसरी) अशी त्यांची नावे आहेत. वलवण धरणात योगेश पालवे (वय ३०, रा. कुरवंडे, लोणावळा), यश कुलदीप धनोरिया (वय १३, रा. लोणावळा) यांचा मृत्यू झाला. मनोज भारत गौतम (वय २५, मूळ रा. उत्तर प्रदेश) असे पवन मावळातील साळुंब्रे गावच्या हद्दीत पवना नदी पात्रात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

**राज्यातील बारामती, राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकांच्या निकालाची उत्सुकता शिगेला**

**चुरशीने झालेल्या मतदानात कोणाची लागणार लॉटरी**

## पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ, पुद्दुचेरी राज्याचा आज लागणार निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : साऱ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल उद्या, सोमवारी जाहीर होणार आहेत. सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होईल. एप्रिल - मे दरम्यान झालेल्या पार पडलेल्या या निवडणुकांमध्ये सर्वच राज्यांत चुरशीची लढत पाहायला मिळाली आहे. यामध्ये ममता बॅनर्जी आपला गड राखणार की भाजप काबीज करणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. दरम्यान राज्यातील बारामती आणि राहुरी दोन विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकांच्या निकालाची देखील उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

एप्रिल - मे दरम्यान झालेल्या या मतदानानंतर आता संपूर्ण देशाचे लक्ष उद्याच्या मतमोजणीकडे लागले आहे. प्रादेशिक अस्मिता, विकास आणि सत्तापालटाची लाट अशा विविध मुद्द्यांवर लढल्या गेल्या आहेत. सर्वाधिक लक्ष बंगालच्या निवडणुकीवर असेल. उद्या सकाळी ८ वाजेपासून मतमोजणीला सुरुवात होईल. दुपारी १२ वाजेपर्यंत बहुतांश राज्यांचे कल स्पष्ट होतील. या निकालांचा परिणाम आगामी राष्ट्रीय राजकारणावर आणि केंद्रातील सत्ता समीकरणांवरही पडण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जी, एम. के. स्टॅलिन आणि हिमंता बिस्वा सरमा यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या भविष्याचा फैसला उद्याच्या निकालांवर अवलंबून आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार




आणि भाजपा आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती आणि राहुरी या दोन विधानसभेच्या जागेसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. आता उद्या या दोन्ही ठिकाणचा निकाल लागणार असून याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बारामतीमधून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, तर दुसरीकडे दिवंगत आमदार कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले राहुरी विधानसभा मतदारसंघांमधून निवडणूक रिंगणात आहेत.

पश्चिम बंगालमध्ये सत्ता राखण्यासाठी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वस्व पणाला लावले आहे. यंदा या राज्यात दोन टप्प्यात (२३ आणि २९ एप्रिल) मतदान झाले. सध्या ममता बॅनर्जी मुख्यमंत्री असून तृणमूल काँग्रेसची सत्ता आहे. भाजपने येथे मुख्य विरोधी पक्ष म्हणून तगडे आव्हान दिले आहे. विशेष म्हणजे, मतदानाच्या टक्केवारीने जुने सर्व रेकॉर्ड मोडीत काढत ९२ टक्क्यांपर्यंत मजल मारली आहे. २०२१ मध्ये टीएमसीने २१५ जागा जिंकल्या होत्या, तर भाजप ७७ जागांवर अडकला होता. यावेळी ही लढत अधिक चुरशीची मानली जात आहे. पश्चिम बंगालमध्ये २९४ जागांच्या विधानसभेत १४८ हा मॅजिक फिगर आहे.

दक्षिण भारताचे महत्त्वाचे राज्य असलेल्या तामिळनाडूमध्ये २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात ८४ टक्के मतदान झाले. द्रविडी राजकारणाची पाळेमुळे घट्ट असून यंदाही मुख्य लढत डीएमके आणि एआयएडीएमके यांच्यातच पाहायला मिळाली. मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली डीएमके सत्ता राखण्याचा प्रयत्न करत आहे. २०२१ मध्ये १३३ जागांसह डीएमके सत्तेत आले होते, तर एआयएडीएमके ६६ जागांसह विरोधी पक्षात आहे. तामिळनाडूत २३४ पैकी ११८ जागा जिंकणारा पक्ष सत्ता स्थापन करेल.

केरळमध्ये एकाच टप्प्यात ७९.७ टक्के मतदान झाले. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफने आव्हान दिलं आहे. केरळमध्ये एकूण १४० जागा असून बहुमतासाठी ७१ जागांची गरज आहे. सद्यस्थितीत एलडीएफ (ङऊऋ) आघाडीचे सरकार असून पिनराई विजयन मुख्यमंत्री आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफ (णऊऋ) ही आघाडी येथे प्रबळ विरोधी पक्ष आहे. गेल्या वेळी डाव्यांनी ९९ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले होते.

ईशान्य भारतातील प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या आसाममध्ये एकाच टप्प्यात ८० टक्के मतदान झाले. नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स (छठउ) आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा (उ) यांसारख्या मुद्द्यांमुळे येथील निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. आसाममध्ये १२६ जागांच्या विधानसभेत ६४ जागा हा बहुमताचा आकडा आहे. सद्यस्थितीत हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजप सत्तेत आहे. त्यांच्यासमोर काँग्रेसने महाआघाडी करून मोठे आव्हान उभे केले आहे. गेल्या वेळी भाजपने ६० जागांसह सत्तेची सूत्रे हाती घेतली होती.

पाँडिचेरी (पदुच्चेरी) या केंद्रशासित प्रदेशात ३० जागांसाठी एकाच टप्प्यात ८१ टक्के मतदान झाले. येथे एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखालील भाजपची युती सत्तेत आहे. पाँडिचेरी (पदुच्चेरी) येथे ३० जागांपैकी १६ जागा बहुमतासाठी आवश्यक आहेत. सद्यस्थितीत मुख्यमंत्री एन. रंगास्वामी पुन्हा एकदा सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील आहेत, तर काँग्रेस आणि डीएमके आघाडीने त्यांना जोरदार टक्कर दिली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### निकालाची उत्कंठा

मतदारांनी मतदानासाठी विक्रमी उत्साह दाखवल्यानंतर पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम ही राज्ये आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील मतपरीक्षेचा निकाल आज, सोमवारी लागणार आहे. सकाळी ८ वाजल्यापासून या विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीस प्रारंभ होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आपले वर्चस्व टिकवते की, भाजप प्रथमच सत्ता काबीज करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यात ७७ केंद्रांवर कडेकोट बंदोबस्तात मतमोजणी होणार आहे. २९४पैकी २९३ जागांसाठी आज मतमोजणी होणार आहे. तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या २३४ मतदारसंघांसाठी ६२ मतमोजणी केंद्रांवर सर्व व्यवस्था पूर्ण झाली असून तीनस्तरीय सुरक्षा योजना सज्ज करण्यात आली आहे. द्रमुक, अण्णाद्रमुक आणि विजय यांच्या पक्षाच्या सहभागामुळे निकालाकडे विशेष लक्ष आहे. सुमारे १.२५ लाख कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. केरळमध्ये सत्ताधारी एलडीएफ, विरोधी यूडीएफ आणि भाजपप्रणित एनडीए यांच्यातील तिरंगी लढतीनंतर, सर्व १४० जागांसाठी मतमोजणी होणार आहे. राज्यात ४३ ठिकाणी मोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. आसाममधील १२६ विधानसभा मतदारसंघांतील ४० मतमोजणी केंद्रांवर सोमवारी कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणी होणार आहे. पुद्दुचेरी विधानसभेच्या ३० जागांच्या निवडणुकीची मतमोजणी पुद्दुचेरी, कारैकल, माहे आणि यानम या चार प्रदेशांमध्ये होणार आहे. दरम्यान, पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील भाजप नेते कुंदन सिंह यांच्या घराबाहेर गोळीबार झाला. याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली. बारामती, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीचा निकालही आज, सोमवारी लागणार आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या एमआयडीसी बारामती येथील गोदामात सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. राहुरीच्या मतमोजणीत २७ फेऱ्या होणार आहेत. सकाळी ९ वाजेपर्यंत पहिला कल आणि दुपारपर्यंत संपूर्ण निकाल हाती येण्याचा अंदाज आहे.

# बाराभाटी परिसरातील मजूर जाणार तेंदूपत्ता रोजगारासाठी!



**दुसऱ्या राज्यात व जिल्हा होणार रवाना : एकदीड महिना असतात बाहेर**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/ बाराभाटी : जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषीवर आधारित आहे. त्यामुळे खरीप आणि रब्बी हंगामातील शेतीची कामे आटोपल्यानंतर शेतमजूर आणि मजुरांच्या हाताला काम नसते. तर यंदा फारसी मनरेगाची कामे सुध्दा सुरु झालेली नाही. परिणामी रोजगाराच्या शोधात मजूरवर्ग जिल्ह्याबाहेर व परराज्यात स्थलातंरण करीत असल्याचे चित्र आहे.

अनेक गावांमध्ये रोजगाराचे पुरेसे साधन नाही, नैसर्गिक हवामानाचे ऋतू बदलतात, तसा मजुरांना सुध्दा रोजगार शोधावा लागतो. उन्हाळ्यामध्ये तेंदूपत्ता संकलनाचे काम मिळते. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास थोडाफार आधार मिळतो. दरवर्षी मनरेगाची कामे मोठ्या प्रमाणात सुरु असतात त्यामुळे मजुरांना गाव परिसरातच रोजगार उपलब्ध होतो. मात्र यंदा प्रशासनाने मनरेगाच्या कामाचे नियोजन न केल्याने मागील महिनाभरापासून मजुरांच्या हाताला काम नाही.

जिल्ह्यातील मजूर दरवर्षी सोयाबीन कापणी, कापूस वेचणीच्या कामासाठी दुसऱ्या जिल्ह्यात जातात. रोवणी सुध्दा करायला महिला मजूर जातात. तर आंध्रप्रदेशात मिरची तोडणीसाठी दरवर्षी जिल्ह्यातील मजूरवर्ग मोठ्या प्रमाणात जात असतो. या ठिकाणी त्यांना जवळपास दोन महिने रोजगार प्राप्त होतो. यामुळे त्यांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास थोडीफार मदत होत असते.

मे ते जून महिन्यापर्यंत तेंदूपत्ता तोडणीचा हंगाम असतो. यासाठी सुध्दा मजूरवर्ग मोठ्या प्रमाणात जिल्ह्याबाहेर जातात. अर्जुनी मोरगाव तालुक्यासह इतरही तालुक्यातील मजूरवर्ग सध्या तेंदूपत्ता तोडणीसाठी दुसजया जिल्ह्यात जात असल्याचे चित्र आहे.

दरवर्षीप्रमाणे आम्ही तेंदूपत्ता संकलासाठी मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, छत्तीसगड या राज्यात जातो.काही मजूर, मुंसी, ड्रायव्हर, चेकर, मॅनेजर अशा पदाच्या कामासाठी जातात. मी चेकर म्हणून कामाला जात आहे.

अनेक वर्षांपासून तेंदूपत्ता हंगामासाठी बाहेर जिल्ह्यात जातो. यंदा वर्धा जिल्ह्यातील तेंदूपत्ता कामासाठी जात आहे. हमालटोली, ड्रायव्हर, मजूर असे अनेक मजूर सोबत घेवून आलो. मी व्यवस्थापक या पदावर कामावर असून यातून ३० ते ४० दिवस रोजगार मिळतो. असे जाणारे नागरिक लोकमत शी बोलतांना सांगितले.



रोजगार उपलब्ध करावागोंदिया जिल्ह्यात उद्योगांचा अभाव असल्याने शेती शिवाय मजुरांना दुसरे काम नाही. त्यामुळे कृषीवर आधारित रोजगार उपलब्ध झाल्यास मजुरांना कामाच्या शोधात इतत्र भटकंती करावी लागणार नाही.स्थानिक लोकप्रतिनिधीनी यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.



अनेक गावात रोजगार हमी बंदचयावर्षी परिसरातील अनेक गावात रोजगार हमीच्या कामांचा नारळ फुटलाच नाही. रोजगार सेवकांनी तसेच पंचायत समितीनी कामाचा आढावा घेतला नाही, कामे काढलेच नाही. परिणामी मजुरांच्या हाताला काम नसल्याने मजुरांचे स्थलातंरण होत आहे.

लघु उद्योग व कुटीर उद्योग नाहीग्रामीण भागात प्रत्येकच गावात लघु किंवा कुटीर उद्योग चालत नाही, अनेक लघु उद्योग बंद पडले, बांबु कामाचा पत्ता कट झाला आहे. मोहफुलांची बंदी, पळसाच्या बियाणे, आंबा घुही, टोरी संकलन असे अनेक उद्योग अनेक दिवसांपासून बंद पडले आहेत.

# पुरवठा विभागतील कामे व घरकुलांचे हप्ते तात्काळ देण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : लोक जनशक्ती पार्टी, कळंबच्या वतीने आज उपविभागीय अधिकारी कार्यालय, कळंब येथे विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात असे म्हटले आहे की, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेचा लाभ गेल्या तीन-चार महिन्यांपासून लाभार्थ्यांना मिळालेला नाही. गरीब व वृद्ध लाभार्थी अडचणीत आल्याने हा थकीत लाभ तात्काळ देण्यात यावा.

**कळंब येथे लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन**

तसेच महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ व अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विकास महामंडळाकडील कर्ज प्रकरणे गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. ती निकाली काढून लाभार्थ्यांना वाटप करावे, अशी मागणी करण्यात आली.

पुरवठा विभाग, तहसील कार्यालया मार्फत शिधापत्रिकेतील नाव कमी करणे, नाव वाढविणे, दुय्यम प्रत देणे व नवीन शिधापत्रिका देण्याची कामे प्रलंबित आहेत. तसेच अनेक अर्जदार पुरवठा विभागाला नाव कमी, समाविष्ठ करण्यासाठी अर्ज करताना परंतु छोट्या कामासाठी २ते३ महिने लागत असल्याने नागरीक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे जलदगतीने काम करण्याची मागणीही निवेदनात केली आहे.

याशिवाय प्रधान मंत्री घरकुल आवास योजना, रमाई आवास योजना व इंदिरा आवास योजनेतील मंजूर लाभार्थ्यांचे घरकुल बांधकामाचे थकीत हप्ते तात्काळ अदा करावेत, असे नमूद करण्यात आले आहे.

उपविभागीय अधिकाऱ्यांनी या सर्व मागण्यांसंदर्भात संबंधित कार्यालयांशी पत्रव्यवहार करून तातडीने पूर्तता करावी, असे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांनी यावेळी सांगितले.

यावेळी तालुकाप्रमुख भारत कदम, शहरप्रमुख नागेश धीरे, बाबा टोपे, गौतम हजारे, बजरंग धावारे यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा नगरसेविका अश्विनी भरत मते यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोप**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**र/(केतन भोज : भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग क्रमांक १२९ च्या नगरसेविका अश्विनी ताई भरत मते यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे लोकार्पण महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, मराठी अस्मिता आणि हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा सोहळा म्हणजे १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून घाटकोपर विभागातील कबड्डीच्या क्षेत्रात नावाजलेले यंग स्पोर्ट्स क्लब संस्थेचे मा.अध्यक्ष यशवंत माझीरे यांच्या हस्ते पारंपारिक पूजा करून शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता अरिहंत हाईटस,तळमजला, पारशीवाडी, घाटकोपर(पश्चिम) येथे संपन्न झाले.या कार्यक्रमाला भरत मते साहेब ,विनायक कोरडे (मास्तर) सुहास कोल्हे, शिवाजी सोनवणे, अरुण घाडीगांवकर,महादेव पवळे, प्रदीप पांडे, ह.भ.प तानाजी तांबारे महाराज,रमेश मोहिते शिवाजी लिमसे, शहाजी शिंदे, अरूण पवार, दिलीप आंबुडकर, रोहिदास आवटे, छोटेलाल यादव, भोनू दुबे, सनद ओझा, संतोष सिंह,संतोष शिंदे, सुनील रोगें,चंद्रसेन नाईक, अशोक भाई टेलर , रमेश मेडिगा,वसंत सावंत, रूपचंद विश्वकर्मा, संदीप यादव, प्रमोद चव्हाण कार्यालय कर्मचारी विश्वनाथ तांबूटकर, तसेच स्थानिक नागरिक, भाजपा पक्षाचे कार्यकर्ते तसेच सामाजिक, सांस्कृतिक,कला,क्रिडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.या जनसंपर्क कार्यालयाच्या सोहळ्यात अश्विनी ताई मते यांनी नागरिकांशी संवाद साधत विकासकामे, स्थानिक समस्या आणि त्यांचे निराकरण यावर भर दिला. नवीन जनसंपर्क कार्यालयातून नागरिकांना थेट संपर्क साधता येणार असून, विविध सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिमा, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या कार्यालयामुळे परिसरातील जनतेला त्यांच्या समस्या मांडण्यासाठी एक नवे व्यासपीठ मिळाले असून, पक्षाच्या कार्याला अधिक गती मिळेल अशी अपेक्षा प्रभाग क्रमांक १२९ च्या नगरसेविका अश्विनी ताई मते यांनी व्यक्त केली.अश्विनी ताई भरत मते यांची ही चौथी टर्म असून त्यांना महानगरपालिकेतील प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. तसेच त्यांनी आरोग्य समिती अध्यक्षा असताना विभागातील अनेक नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या सोडविल्या आहेत. प्रभागातील तळापासून डोंगराच्या शेवटच्या झोपडी पर्यत पाणी पोहचवले.प्रभागात पथदिवे, रस्ते दुरुस्ती, खड्डे बुजवणे, पाणीपुरवठा, नालेसफाई मलनिस्सारण व्यवस्था कचरा व्यवस्थापन व सार्वजनिक शौचालये, पावसाळ्यात पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन अशी विकास कामे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केली. सध्या त्या एन वार्ड प्रभाग समिती अध्यक्षा असून महिला बाल कल्याण सदस्य, बाजार उद्यान समिती सदस्य आहेत.



# कुर्मी जोडो अभियानाची घोषणा : समाज एकतेसाठी राज्यभर उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभा,महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने कुर्मी जोडो अभियान (६ जून २०२६ ते १५ ऑगस्ट २०२७) राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय इतिहासातील दोन महत्त्वपूर्ण घटनांच्या स्मरणार्थ हे अभियान आयोजित करण्यात येत आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन (६ जून १६७४) आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी उपपंतप्रधान पदाची घेतलेली शपथ (१५ ऑगस्ट १९४७) या दोन ऐतिहासिक घटनांमधून समाज एकता, स्वाभिमान आणि राष्ट्रनिर्मितीचा संदेश मिळतो. याच प्रेरणेने हे अभियान सुरू करण्यात येत आहे.अभियानाचा शुभारंभ ६ जून २०२६ रोजी रायगड किल्ल्यावर होणार असून सांगता समारंभ १५ ऑगस्ट २०२७ रोजी गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी येथे होणार आहे. सुमारे १४ महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट कुर्मी समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे, समाजात एकता व बंधुभाव वाढवणे, विविध नावांनी ओळखल्या जाणाऱ्या समाजघटकांमध्ये एकात्मतेची जाणीव निर्माण करणे तसेच समाजातील महापुरुषांचे विचार पुढे नेणे आणि युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे हे आहे.कुर्मी या प्रातिनिधिक संज्ञेत मराठा, रोड मराठा,कुणबी,कुडुंबर, कलबी, कुडुमी, वेलमा, गुर्जर, पटेल, पाटीदार, रेड्डी, कापा. कम्मा, कुलमी, नायक,नायडू,कापूनाडू, खंडायत, ओक्का लिंगा,देवेंद्र कुल वेल्लालार,कंबोज, अंजना समाज आदी विविध समाजघटकांचा समावेश मानला जातो. विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या नावांनी ओळखला जाणारा हा समाज मुळात एकच असल्याची जाणीव दृढ करणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे.अभियानांतर्गत समाज एकता रॅली, मेळावे, गाव व पार बैठका, युवक व महिला सक्षमीकरण कार्यक्रम, शैक्षणिक मार्गदर्शन शिबिरे, नाटिका व पथनाट्य, सामाजिक संवाद उपक्रम तसेच डिजिटल आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. याशिवाय निबंध व वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजातील कर्तृत्ववान व्यक्ती व संस्थांचा सन्मान सोहळा आयोजित केला जाणार आहे.हे अभियान केवळ एक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणण्याचा, त्याची ओळख मजबूत करण्याचा आणि भविष्याची दिशा ठरवण्याचा व्यापक प्रयत्न असल्याचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय पाटील, प्रदेश महासचिव जयेश शेलार पाटील आणि प्रदेश कोषाध्यक्ष संदीप काळे पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

**पालकमंत्र्याच्या हस्ते ध्वजारोहण, पोलीस विभागाच्या २७ वाहनांचे उद्घाटन**

# जिल्ह्यात योजनांची प्रभावी अंमलबजावणी, विकासाला गती : पालकमंत्री ना.मकरंद जाधव पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे /चिखली तालुका प्रतिनिधी : बुलढाणा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कृषी, पशुसंवर्धन,उद्योग,महिला सक्षमीकरण आणि डिजिटल सुविधा या विविध क्षेत्रांमध्ये शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांमुळे जिल्ह्याच्या विकासाला गती मिळत असून समृद्ध, सक्षम आणि सर्वसमावेशक बुलढाणा घडविण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी केले.

पोलिस कवायत मैदान येथे १ मे महाराष्ट्राच्या ६७ व्या स्थापना दिवस व कामगार दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम पार पडाला, यावेळी ते बोलत होते. आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ.प्रविणकुमार देवरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलिस अधिक्षक निलेश तांबे,अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार,उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, राजेंद्र पोळ, समाधान गायकवाड, स्वातंत्र सेनानी, वीरमाता, वीरपत्नी, ज्येष्ठ नागरिक, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री मकरंद पाटील म्हणाले की,बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांसमोर उभ्या राहिलेल्या अडचणींचा विचार करून शासनाने अवेळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील १ कोटी ५ लाख ९२ हजार शेतकऱ्यांसाठी १६ हजार २२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, बुलढाणा जिल्ह्यातील ६ लाख २९ हजार शेतकऱ्यांना ८९३ कोटी ३ लाख रुपयांची मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. या मदतीतून कोणतीही बँक वसुली होऊ नये, असे निर्देश शासनाने दिले आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आली असून, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जाची माफी होणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देऊन शासन त्याच्या सन्मान करणार आहे. या योजनेचा लाभ जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना होणार आहे.

**पोलीस विभागात २७ नवीन वाहनाचा समावेश**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने पोलीस विभागासाठी उपलब्ध करण्यात आलेल्या २७ नव्या वाहनांचे उद्धाटन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर ही वाहने पोलीस विभागाला हस्तांतरित करण्यात आले.

या वाहनांमध्ये महिला सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या दामिनी पथकांच्या ७ वाहनांचाही समावेश आहे. नव्या वाहनांमुळे पोलीस प्रशासनाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार असून आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देणे अधिक सुलभ होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# निर्भया पथक पंढरपूर विभाग यांना पंढरपूर तालुका हद्दीत होणारा बालविवाह रोखण्यात यश

## दिड महिन्यात सलग तिसरा बालविवाह पथकाने रोखला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दिनांक ०३/०५/२०२६ रोजी मा. श्री प्रशांत डगळे, सहा. पोलीस अधिक्षक सो. (भा.पो.से) पंढरपूर विभाग, यांना बालकल्याण समिती अध्यक्ष समीर सय्यद यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे पंढरपूर तालुका हद्दीत एक बालविवाह होत असल्याचे बातमी मिळाल्याने निर्भया पथक पंढरपूर यांनी सदर ठिकाणी तात्काळ जावुन चौकशी केली असता सुरुवातीला मुलीचे नातेवाईकांनी मुलगीचे वय १८ वर्षे पुर्ण आहे तिची बारावी होवून खुप वर्षे झाले असे सांगितले, मात्र निर्भया पथकाने चौकशी करुन ती शिकत असलेल्या शाळेतुन तिचे बोनाफाईड प्रमाणपत्र घवून आले असता तिचे वय हे १७ वर्षे ५ महीने दिसुन आले. व त्यानंतर तो होणारा विवाह तिचे आई वडीलांना समज देवुन तत्काळ रोखण्यात आलेला आहे. व त्या अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती, सोलापूर यांचेसमक्ष पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आले.

तसेच निर्भया पथक, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण तसेच करकंब पोलीस ठाणे हद्दीतील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, आपले हद्दीमध्ये, आपल्या नातेवाईकांमध्ये अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास आम्हास, निर्भया पथकास संपर्क करावा (९११२२२६३५२) व यापुढे कोणी अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करेल अशा लोकांवर प्रचलित कायद्यानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल. तसेच अशा लोकांची गय केली जाणार नाही असे सांगितले आहे.

सदरची कारवाई मा. अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण, मा. प्रितम यावलकर, अप्पर पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण, मा. प्रशांत डगळे, सहा. पोलीस अधिक्षक (भा.पो.से) पंढरपूर विभाग, पोलीस निरिक्षक तय्यब मुजावर पंढरपूर तालुका यांचे मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख म. पोलीस उपनिरीक्षक / सुप्रिया यादव/रावण, म. पोकॉ/१३११ वाघमारे, पोकॉ/१२३६ सावंत, म. पोकॉ/२०४८ काझी, पंढरपूर तालुका पो.स्टे. नेमणुकिस असलेले पोहेका १७९२ भोसले यांनी पार पाडलेली आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सहकार्यातून करमाळासाठी २५ लाखाचा निधी मंजूर: नगराध्यक्ष मोहिनी सावंत यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : नागरिकांच्या तक्रारीची तत्काळ दखल घेऊन सदर तक्रार तातडीने मार्गी लावण्याचा धडाका करमाळा नगरपालिकेच्या नगराध्यक्ष मोहिनी संजय सावंत उपनगध्यक्ष अतुल फंड यांनी लावला आहे. प्रभाग सात मधील अस्वच्छता आणि पाणी प्रश्नाबाबत नागरिकांनी दिलेली निवेदनानंतर, नगराध्यक्षांनी प्रत्यक्ष पाहणी करून कसाब गल्ली ते कानड गल्ली आणि शाहूनगर परिसरातील पाणी योजनेसाठी सुमारे २५ लाख रुपये यांच्या कामांना पालकमंत्री जयकुमार गोळे यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

नगराध्यक्ष मोहिनी सावंत उपनगराध्यक्ष अतुल फंड कामाचे स्वरूप आणि व्याप्ती लक्षात घेऊन प्रभाग सात कसाब गल्ली ते कानडा गल्ली येथील जुनी पाईपलाईन बदलण्यासाठी आठ लाख ९९ हजार ३५२ रुपये रुपयांचा निधीला पालकमंत्री च्या सहकार्याने मंजुरी घेतले आहे त्यामुळे या भागातील कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि गळतीचा प्रश्न मार्गी लागणार आहे तसेच शाहूनगर परिसरातील शाहूनगर भाग एक मधील पाईपलांसाठी नऊ लाख ९१ हजार ३७२/ रुपये तर शाहूनगर भाग दोन मधील पाईपलाईन बोलण्यासाठी,६,०९,४०८/ अशा मोठ्या रकमेची प्रशासकीय मंजुरी मिळवली आहे.

वरील मंजुरीसाठी नगरपरिषदेतील सर्व नगरसेवक यांचे विशेष सहकार्य लाभले आहे सदर कामाच्या ही निविदा प्रक्रिया पूर्ण करून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल असे नगराध्यक्ष मोहिनी सावंत यांनी स्पष्ट केले आहे काही दिवसापूर्वी प्रभाग सात मधील नागरिकांनी नगरपालिके देऊन नगराधेक्षांची भेट घेतली होती निवेदनाची गांभीर्य ओळखून त्यांनी तातडीने पाहणी केली आणि अधिकाऱ्यांना स्वच्छतेचे व पाईपलाईन बदलण्याबाबत अंदाजपत्रक तयार करण्याची आदेश ही दिले होते.

अवघ्या काही दिवसात निधीची तरतूद झाल्याने नगराध्येंच्या कार्यतत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करताना नागरिक म्हणाले की आम्ही आमच्या समस्या बाबत नगराधिकांना फक्त एकदाच भेटलो होतो त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता तातडीने प्रत्यक्ष पाहणी केली आणि आता निधीची ही तरतूद केली नागरिकांच्या तक्रारीचे निवारण इतक्या वेगाने झाल्यामुळे आम्ही यांचे मनापासून आभार मानतो व नगराध्यक्षांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे शहरातील रखडलेली कामे मार्गी लागत असल्याचे चित्र आता करमाळ्यात दिसत आहे.

# जिल्हा परिषद स्वीकृत सदस्य पदी भाजपचे प्रणव परिचारक, तर शिवसेनेकडून अनिल सावंत यांची वर्णी लागणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये सहा स्वीकृत सदस्य घेण्यात येणार आहे. यामध्ये भाजपकडून युवा नेते प्रणव परिचारक, तर शिंदे शिवसेना गटातून अनिल सावंत यांची यंदा संधी मिळणार असल्याची राजकीय वर्तुळातून चर्चा सुरू आहे.

युवा नेते प्रणव परिचारक यांची पंढरपूर तालुक्यांमध्ये चांगली काम आहे. त्यांनी पंढरपूर तालुक्यांमध्ये भाजपच्या युवकांना एकत्र करून भाजपचे चांगली मोर्चे बांधणी केली आहे. नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडणुकीमध्ये भाजपला चांगले यश मिळाले आहे. युवा नेते पण उपचार यांना स्वर्गीय सुधाकर पंत परिचारक यांचे राजकारणातील बाळकडू मिळाले आहे. तसेच माजी आमदार प्रशांत परिचारक, व युट्युबियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक यांचे परिणाम प्रचारक यांना मार्गदर्शन मिळत असल्याने जिल्हा परिषदेमध्ये सहाशे रुपये सदस्य घेण्यात येणार आहेत. भाजपला पाच जागा तर शिवसेना शिंदे घाटाला एक जागा मिळणार आहे. भाजपमधून युवा नेते प्रणव परिचारक शिंदे शिवसेना गटातून आणि सावंत यांची नावाची चर्चा सुरू आहे.

# महसूल विभागाच्या तत्परतेने रस्त्याने घेतला मोकळा श्वास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील हनुमाननगर येथील नाशिक – छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या उत्तरेला गोळेगाव रस्त्यापर्यंत जाणारा देवनळी रस्ता एका शेतकऱ्याच्या अडेलतट्टूपणामुळे गेल्या सहा दिवसांपासून बंद होता. त्यामुळे या मार्गाने ये – जा करणारे नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच शेतमाल वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.






याबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी कोणताही वाद न घालता निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्याकडे निवेदन सादर केले. तहसीलदारांनी तातडीने दखल घेत मंडळ अधिकारी संतोष डुंबरे यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मंडळ अधिकारी संतोष डुंबरे, ग्राम महसूल अधिकारी आनंद गोटम आणि ग्राम महसूल सहाय्यक सागर मस्कर यांनी दोन्ही बाजूंच्या ज्ञानेश्वर कडलग, वसंत विष्णू कडलग, छबू गोपाळ बोरणारे, युवराज दरेकर, वसंत किसन कडलग, शिवाजी पवार, अनिल कडलग, विजय कडलग, संतोष कडलग, नवनाथ कडलग, आनंदा कडलग, भाऊसाहेब कडलग,

### शेतकरी वर्गाने व्यक्त केले समाधान

योगेश तरटे आदी शेतकऱ्यांशी चर्चा करून परस्पर सहमतीने रस्त्यातील अडथळा दूर केला. त्यामुळे बंद असलेला रस्ता पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. या कारवाईमुळे नागरिक, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांनी महसूल विभागाचे आभार मानले. प्रशासनाच्या तत्परतेमुळे रस्त्याने अखेर मोकळा श्वास घेतला.

# राष्ट्रवादी पक्षाच्या माळशिरस आणि उत्तर सोलापूरच्या निरीक्षकपदी नागेश फाटे यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर येथे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील तालुका निरीक्षकांच्या निवडी जाहीर

पंढरपूर /प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सोलापूर जिल्ह्यात नूतन जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय पदाधिकारी निवडीसाठी तालुका निरीक्षकांच्या निवडी शनिवारी पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या.

यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग, व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्यावर माळशिरस आणि उत्तर सोलापूर तालुक्याच्या निरीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आली.

यावेळी विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर पडगळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष दीपक वाडदेकर ,राज्य प्रवक्ते महादेव तळेकर, राज्य उपाध्यक्ष हरिदास रणदिवे, राज्य महिला उपाध्यक्ष कोमलताई ढोबळे, महिला जिल्हाध्यक्ष पल्लवी पाटील, मृदुला तळेकर, विनंती कुलकर्णी ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेख, युवती अध्यक्ष विश्रांती कुलकर्णी, पंढरपूर तालुका अध्यक्ष अतुल चव्हाण, यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील पक्षातील सर्व तालुकाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष , फ्रंटल व सेलचे सर्व जिल्हाध्यक्ष पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून सोलापूर जिल्ह्यात आपला दबदबा कायम ठेवून पुढील काळात पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यासाठी पक्षातील अनुभवी नेतेमंडळींना पक्ष निरीक्षक पदाची जबाबदारी घेण्यात आली आहे.

पक्ष निरीक्षकाच्या माध्यमातून तालुकास्तरावर बैठका घेऊन पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या जाणार आहेत. यामध्ये शेवटच्या कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून आगामी काळात तालुका पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे.

# 'आमदार चषक २०२६' विजेता ठरला सुखकर्ता -११

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




आचेगांव : दि. आचेगांव ता. दक्षिण सोलापूर येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नावे गेल्या सहा दिवसापासून सुरु असलेल्या महेश बिराजदार युवा मंच व गटनेता बलवान गोतसुर्वे मित्र परिवार आयोजित आमदार चषक २०२६ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा सुखकर्ता इलेव्हान सोलापूर संघांनी हणमंत फुटाणे -पाटील निंबाळ संघावर मात करीत यंदाचा आमदार चषक पटकावला.विजेत्या संघास १११७८९/- रोख रक्कम व स्प्लेंडर बाईक आणि चषक व उपविजेत्या संघास द्वितीय क्रमांकाचे ७१७८९/- रोख रक्कम व चषक आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते व दक्षिण सोलापूर पंचायत समिती सभापती संदीप टेळे, महेश बिराजदार, जिल्हापरिषद सदस्य विकास बुळळा, नेताजी खंडागळे, पंचायत समिती सदस्य सुरज पाटील, योगीराज बाबा बाजारमठ, वळसंग पोलीस स्टेशनचे ए.पी.आय.राहुल डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थित देण्यात आले.

तृतीय क्रमांकाचे बक्षीस रोख रक्कम ४५७८९/- व चषक वळसंग पोलीस स्टेशन संघास तर चौथ्या क्रमांकाचे बक्षीस रोख रक्कम ३५७८९/- व चषक सह्याद्री वॉरियर्स उळे या संघास देण्यात आले. त्याच बरोबर मालिकावीर शुभम टंकाळे यांस एल. ई. डी टीव्ही तर सर्वोत्कृष्ट गोलंदाज राजकुमार हिरेमठ, सर्वोत्कृष्ट फलंदाज आकाश चव्हाण,प्रत्येक दिवशी प्लेयर ऑफ द डे म्हणून मयूर राठोड, रोहित राठोड, जान लालू, शंकर कोळी या सर्वांना स्पोर्ट्स सायकल देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेत एकूण १२ संघ आणि त्यातील खेळाडू क्रिकेटपट्टू ऑक्शन द्वारे निवडण्यात आले होते.

### अंतिम सामना व बक्षीस वितरणला आ. सचिन कल्याणशेट्टी यांची उपस्थिती

आचेगांव विनर करिअर अकॅडमी च्या सहकार्याने खालील मान्यवरांकडून प्रथम क्रमांकाचे बक्षीस मोरया कन्ट्रक्शनचे अशोक राठोड यांच्या तर्फे एक लाख अकरा हजार सातशे एकोणव्वद रुपये (१११७८९/-) व द्वितीय क्रमांकाचे बक्षीस योगीराज बाबा बाजारमठ यांच्या तर्फे एकात्तर हजार सातशे एकोणव्वद रुपये (७१७८९/-), तृतीय क्रमांकाचे बक्षीस मल्लू चिवडशेट्टी सावकार यांच्यातर्फे पंचेचाळीस हजार सातशे एकोणव्वद (४५७८९/-) व चौथ्या क्रमांकाचे बक्षीस पंचायत समिती उपसभापती वर्षाताई गुड्डू अण्णा पटणे यांच्या तर्फे पस्तीस हजार सातशे एकोणव्वद रुपये (३५७८९/-)देण्यात आले.


निरोगी आयुष्यासाठी मैदानी खेळाची गरज असून ग्रामीण भागात अश्या स्पर्धेने चांगले खेळाडू घडण्यास नक्कीच याचा फायदा होत असल्याचे सांगत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी एवढ्या मोठया प्रमाणावर सुयोग्य नियोजन करून शिस्तबद्ध पद्धतीने सामने भरवल्या संयोजक मंडळींचे कौतुक केले.या स्पर्धेचे ब्रँड म्बेसिडर प्रसिद्ध क्रिकेटपट्टू आकाश चव्हाण हे होते.यावेळी अशोक पाटील, संयोजक समितीचे सचिन मंगरुळे, अनिल पाटील,माजी सरपंच गोविंद वलेकर, श्रीशैल दूधगी, सागर कोळी, राजकुमार बाईटपल्ली, सरपंच विश्रांती पाटील, रमेश क्षीरसागर, महिबूब पटेल, रफिक मुल्ला, मालकप्पा कोडले, सिद्धू तिपरादी, धनलिंग मिरजे, लक्ष्मण हुल्ले, महादेव कोरे, हणमंत कोळी,मल्लू ढब्बे,चंदू शिलेणी, सिद्धाराम वाघमारे,हुसेन पटेल,शांतकुमार गायकवाड,कुलदीप पाटील,सुरेश मोची यासह तालुक्यातील मोठया प्रमाणात आजी माजी पदाधिकारी, क्रिकेट शौकीन व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. सामने युट्यूब वर लाईव्ह असल्याने त्या माध्यमातून हि अनेकांनी सामन्याचा लाभ घेतला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घनश्याम मंगरुळे, बबलु बिराजदार, हसन बिराजदार, सिकंदर बिराजदार, मॉन्टी घुंगरगाव, समीर जवळगे, सागर गोतसुर्वे, अमोल शिलेणी आदिनी परिश्रम घेतले.

**वारंवार मनपा एन विभाग प्रशासनाकडे लेखी पाठपुरावा करून देखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप**

# रामनगर (अ) येथील धोकादायक स्थितीत असलेल्या नाल्याच्या दुरुस्तीचे काम पावसाळ्यापूर्वी करण्याची सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : घाटकोपर पश्चिम येथील रामनगर (अ) परिसरातील प्रभाग क्रमांक १२७ मध्ये शंकर मंदिरा शेजारील मुख्य पाण्याच्या टाकीमागील गटार पूर्णपणे खचले असून,त्याठिकाणी धोकादायक स्थितीत निर्माण झाली आहे.या संदर्भात वारंवार तक्रार करूनही बृहन्मुंबई महानगरपालिका (मनपा) 'एन' विभाग याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी केला आहे. तसेच या गटारातील गाळ कचरा हा वेळेवर काढला जात नसल्यामुळे हे गटार वारंवार तुंबत असून त्यामुळे गटारातील कचरा आणि सांडपाणी थेट रस्त्यावर येत असल्याने पादचाऱ्यांना चालणे देखील याठिकाणी कठीण होते.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे,या गटाराच्या अगदी समोरच संपूर्ण विभागाला पाणीपुरवठा करणारी मोठी पाण्याची टाकी आहे.गटार तुंबत असल्यामुळे गटातील सर्व घाणीचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या टाकीत मिसळण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून, यामुळे हजारो स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.


केतन दत्ताराम भोज



### पावसाळ्यापूर्वी गटाराच्या दुरुस्तीची मागणी

येत्या काही दिवसांत पावसाळा सुरू होणार आहे.त्यापूर्वी या खचलेल्या गटाराचे बांधकाम करून त्यावर कायम स्वरूपी लोखंडी जाळी बसवण्यात यावी, यासाठी सामाजिक कार्यकर्ते केतन भोज यांनी यांनी मनपा 'एन' विभागाच्या सहाय्यक आयुक्तांना लेखी पत्र दिले होते. मात्र सतत या संदर्भात पाठपुरावा करून ही या पत्रावर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे दिसत आहे. तरी उद्या पावसाळ्यात याठिकाणी कोणती दुर्घटना घडल्यास त्याला संबंधित मनपा एन विभाग प्रशासन त्यांच्या परिरक्षण विभागाचे अधिकारी या सर्व घटनेला जबाबदार असतील असे सोशल मीडियाच्या माध्यमातून या समस्येकडे लक्ष वेधताना केतन भोज यांनी संताप व्यक्त केला आहे.त्यांनी म्हटले आहे की, जर या ठिकाणी भविष्यात कोणतीही दुर्घटना घडली किंवा नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला, तर त्याला सर्वस्वी 'एन' विभाग प्रशासन आणि त्यांच्या परिरक्षण विभागाचे अधिकारी जबाबदार असतील.

# सिन्नर तालुक्यातील पोलीस भरतीसाठी निवड झालेल्या ३१ मुलांचा गौरव

## पोलीस दलात शिस्त ही सर्वात मोठी ताकद असते : पोलिस अधीक्षक कांतीलाल पाटील यांचे प्रतिपादन






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पोलीस भरती झालेल्या विद्यार्थ्यांनी नेहमी वेळेचे पालन करा, वरिष्ठांचा आदर ठेवा , प्रामाणिकपणे काम करा , दररोज व्यायाम करा, धावणे आणि फिटनेस यावर लक्ष द्या . नोकरीत शारिरीक ताकद फार महत्वाची आहे . सार्वजनिक सेवक म्हणून नागरिकांशी नम्रपणे व आदराने वागा, लोकांचा विश्वास जिंकणे खुप महत्वाचे आहे असे कांतीलाल पाटील यांनी मनोगतातून मार्गदर्शन केले

१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांच्या संकल्पनेतून सिन्नर पोलीस स्टेशन येथे सिन्नर तालुक्यातील पोलीस भरतीसाठी निवड झालेल्या ३१ मुलांचा गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सिन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे म्हणाले की -पोलीस नोकरीत तणाव फार असतो. ध्यान, योग किंवा छंद यांचा उपयोग करून मानसिक संतुलन ठेवा या बाबत मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांना मार्गदर्शन करतांना पुढे सांगितले की, नवीन तंत्रज्ञान, सायबर क्राइम, डिजिटल साधने यांची माहिती घ्या. आधुनिक पोलिसिंगसाठी हे आवश्यक आहे. आपल्या सहकाऱ्यांसोबत समन्वय ठेवा. एकत्र काम केल्याने काम अधिक प्रभावी होते.

सतत शिकत रहा

नवीन नियम, कायदे, प्रशिक्षण यामध्ये सहभागी व्हा. स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे आहे.

स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घ्या

कामाबरोबरच आरोग्य आणि कुटुंबालाही वेळ द्या असेही हेमंत कुमार भामरे म्हणाले . यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भरत जाधव -पोलीस निरीक्षक - MIDC पोलीस स्टेशन सिन्नर. एस बी देशमुख, सचिव -महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ. रूपाली चव्हाण -सह पोलीस निरीक्षक, पि एस आय, अंकुश वारुंगसे, -दादासाहेब गाढवे, योगेश शिंदे, संजय गोसावी तसेच पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी विद्यार्थी, व सिन्नर पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील हजर होते.

# मोहा येथे जगाला शांततेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रवीण कसबे : जगाला शांततेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या उत्साहात मोहा येथे साजरी करण्यात आली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कसबे व अश्रूबा नागटिळक यांनी परम पूज्य बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पूजा करण्यात आली.

यावेळी बोलताना किसन जाधव यांनी संपूर्ण जगाला युद्धाची नाही तर बुद्धाची गरज आहे हे आवर्जून सांगितले यावेळी ऑल इंडिया पॅन्थर सेना जिल्हा अध्यक्ष अशोक कसबे जयंती उत्सव कमिटीचे सचिव आकाश कसबे, गणेश कसबे, फकीर कसबे, शुभम कांबळे, तानाजी कसबे, मोहा ग्रामपंचायत सदस्य महावीर कसबे, राहुल कसबे,मिलिंद कसबे, साई गायकवाड, कमलाकर कसबे, प्रवीण कसबे, अरविंद हिरवे व मोठ्या प्रमाणात महिला व समाज बांधव उपस्थित होते. गणेश कसबे यांनी उपस्थित सर्व बांधवाना स्वखर्चातून खीर वाटप करण्यात आली.

# श्री बसवेश्वर प्रशाला काजीकणबस येथे श्री आणण्पा सोनकांबळे यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : श्री बसवेश्वर प्रशाला काजीकणबस येथे श्री आणण्पा सिताराम सोनकांबळे सर यांचा सेवापूर्ती निरोप समारंभ उत्सवात व भावनिक वातावरणात संपन्न झाले.

गोगाव येथील श्री आणण्पा सिताराम सोनकांबळे सर हे श्री बसवेश्वर प्रशाला मध्ये कार्यरत असलेले ज्येष्ठ शिक्षक श्री आणण्पा सिताराम सोनकांबळे सर गेले २५ वर्षं इंग्रजी विषयाचे अध्यापन करुन प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवेनंतर दि. ३०-५-२०२६ रोजी नुसतेच सेवानिवृत्त झाले त्यांच्या या सेवापूर्ती निमित्त शाळेत एक निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन श्री प्रभाकर मजगे सर यांनी भूषवले, सर्वप्रथम श्री बसवेश्वर महाराज व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, कार्यक्रमाची प्रस्तावना करताना मुख्याध्यापक श्री - शिवराज किलजे सर म्हणाले की आणण्पा सोनकांबळे सर शाळेसाठी योगदान अमूल्य आहे त्यांनी केवळ अध्यापनच केले नाही तर हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले आहे त्यांचा शिस्तप्रिय आणि प्रेमळ स्वभाव सर्वांसाठी आदर्श आहे.

**गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी गोगांव ग्रामस्थ वतीने सत्कार करून शुभेच्छा दिले**

या कार्यक्रमात श्री आणण्पा सिताराम सोनकांबळे सर यांचा सेवापूर्ती निमित्त शाल श्रीफळ



सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला ,सहकारी शिक्षकांनी त्यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला उपस्थित मान्यवर व अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले श्री आणण्पा सोनकांबळे सर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना शाळेतील आपल्या प्रवासाबद्दल सांगून सर्वांचे आभार मानले, निरोप समारंभासाठी प्रमुख उपस्थिती मा जि. प. सदस्य श्री आनंद तानवडे, धोंडिबा कुंभार, शालेय समिती अध्यक्ष गौरीशंकर मजगे, मेजर कलाकार कांबळे, दत्तात्रेय मुनाळे , मा सरपंच दिपक मंठाळे, रत्नाकर गायकवाड, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, परमेश्वर बिराजदार, श्रीशैल पाटील, शाम बाबर , शांतकुमार बनसोडे श्री बसवेश्वर प्रशाला शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सुत्रसंचलन दयानंद चिकणे सर यांनी केले आभार संजय सुरवसे सर यांनी मानले.

# वागदरी येथे भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड :

सबंध विश्वाला शांतीचा समतेचा अहिंसेचा आणि मानवतेचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने वागदरी ता.तुळजापूर येथे विविध कार्यक्रम करून आभिवादन करण्यात आले.

दि.१ मे २२६ रोजी वैशाखी पौर्णिमा रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्ताने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरी ता. तुळजापूरच्या वतीने अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

येथील पंचशील बुध्द विहार समाज मंदिराच्या प्रागंणात बुद्ध जयंती निमित्ताने सकाळी आठ वाजता उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी ठिक ७.३० वाजता तथागत महात्मा गौतम बुद्ध व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन नवोदित वधू वर धम्मदीप बनसोडे व ऋतिका गायकवाड, यांच्या शुभ हस्ते तर जयंती उत्सव कमिटी चे अध्यक्ष महादेव वाघमारे,उपाध्यक्ष दीपक वाघमारे,सचिव चंद्रकांत वाघमारे,सदस्य एस.के . गायकवाड आदींच्या प्रमुख उपस्थितीत पूजन करून फोटो प्रतिष्ठापना करून सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली.





यांप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली तर आर्केस्ट्रा कलावंत तानाजी भोरे पुणे यानी पिंपळाच्या पानावर कोरले नाव ते बुद्धांचे,बोद्धी वृक्षाने कथन केले चारित्र्य गौतमाचे हे गीत सादर करून उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

या प्रसंगी बोलताना रिपाइं (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड म्हणाले की बहुजनांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच चांगल्या संस्काराची गरज असून सुसंस्कृत आणि निर्व्यसनी समाज निर्मितीसाठी महामानव डॉ.बाबासाहेबआंबेडकरांनी आपणाला बौद्ध धम्म दिला आहे. तेंव्हा शिक्षण घेवून मानवतेची शिकवण देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बौद्ध धम्म पद्धतीने आपण आपले जीवन व्यथित करून आपला सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करावा असे आवहान केले.

शेवटी बुद्ध जयंती निमित्त भोजनदान देवून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.यावेळी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते महिला ग्रामस्थ जेष्ठ कार्यकर्ते युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुका संपताच व्यवसायिक गॅसची दरात वाढ; महागाईचा उडणार भडका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पश्चिम बंगाल सह पाच राज्याच्या निवडणुका पार पडल्या त्यामुळे निवडणुका संपतात व्यावसायिक गॅस दरामध्ये आव्हान करण्यात आले आहे. एक मे पासून व्यावसायिक गॅस दरात वाढ एक हजार रुपये करण्यात आली आहे आता हा व्यवसायिक गॅस ३०७१/ मिळणार आहे. हॉटेल व रेस्टॉरंट मधील खाद्यपदार्थाच्या किमती वाढण्याची शक्यता आहे . हिरण अमेरिका हे दुसरं आहे त्यामुळे गेल्या दोन महिन्यापासून गॅसची टंचाई सुरू आहे. महिलांना त्रास होऊ नये म्हणून घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू करण्यात आला आहे. मात्र व्यावसायिक गॅसवर निर्बंध लावण्यात आले आहेत. व्यवसायिक व घरगुती गॅसचा काळाबाजार होणे याकडे लक्ष केंद्रित केले आहे. पश्चिम बंगालचे पाच राज्यातील निवडणुका घेण्यात आले आहे. चार मे रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे देशातील निवडणुका पार पडल्यामुळे आता दरवाढ होण्यास सुरुवात होणार आहे. व्यावसायिक करणारा गॅस १९ किलोचा आहे. त्याची एक हजार रुपयांनी वाढ झाली आहे. आता तो गॅस३०७१/ विक्री होऊ लागली आहे.

**बुद्ध पौर्णिमेनिमित्त फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १६८ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न**

# विश्वाला बुद्ध हवा याची प्रचिती येण्यासाठी विश्व बुद्धमय करावे लागेल : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुद्धानेच आवाहन केले आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६८ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा मैत्रेय, ज्ञानतीर्थ को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी, एन-८, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे १ मे २०२६ ला संपन्न झाली.



फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्याकडे अनेक गंभीर समस्या असल्या तरी त्या अनुषंगाने आपण किती गंभीर आहोत? यावरच त्याचे परिणाम अवलंबून असतील. उप वर्गीकरण ही गंभीर समस्या असली तरी अशा समस्या कशामुळे निर्माण होतात? याची कारणे शोधून उपाय योजना केल्या पाहिजेत. बहुतांश पक्ष, संघटना, संस्थांना नेमकेपणाने काय करावे? याची जाणीव नसल्याने त्यांचे कार्य अर्थहीन ठरत आहेत. धम्म म्हणजे नीति आणि नीति म्हणजे धम्म होय. धर्मातील अनैतिकता नाकारण्यासाठी धम्मातील नैतिकतेचे आचरण केले पाहिजे. समाज जीवनात शिकली सवरलेली शिक्षित, उच्च शिक्षित, अति उच्च शिक्षित माणसे असली तरी सुशिक्षित, प्रज्ञावान माणसांची न्यूनता आहे.

आदर्श महापुरुषांच्या अनुषंगाने गीताच्या माध्यमातून प्रबोधन करीत असताना बुद्ध कबीर भीमराव फुले, त्यांनी जनजीवन फुलविले. असे वामनदादा कर्डक म्हणतात. म्हणून या आदर्श महापुरुषांच्या विचारांची बाग फुलविण्यासाठी त्या विचारांचे आचरण केले पाहिजे. जेणेकरून या विश्वाला बुद्ध हवा याची प्रचिती येण्यासाठी हे विश्व बुद्धमय करावे लागेल. करिता ६ मे १९५५ ला सोपारा येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संदेश म्हणजे मानवाच्या विवेकबुद्धीला केवळ बुद्धानेच आवाहन केले आहे. याचे मर्म समजून घ्यावे लागेल. मानवी जीवनात निर्माण होणाऱ्या आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक दुःखाचे निर्मूलन करण्यासाठी पंचशील, अष्टांगिक मार्ग व दहा पारमितांचे आचरण करून वैज्ञानिक तार्किक बुद्ध धम्माकडे वळता येईल. याची तिव्रता उपासकांच्या लक्षात यावी म्हणून बुद्ध पौर्णिमेनिमित्त सदरील विषयावर जाणीवपूर्वक कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करतांना सामाजिक कार्यकर्ते सुखदेव साळवे म्हणाले की, दान धर्म, पूजा अर्चा, कुशल कर्माने बुद्ध जयंती साजरी केली पाहिजे. प्रमुख वक्ते के. एम. मुदगडकर म्हणाले की, विविध जातक कथाचे मर्म समजून घेतले पाहिजे. याप्रसंगी प्रा. विलास कटारे म्हणाले की, धम्म आचरण करून माणुसपण जपले पाहिजे. सुभाष वानखेडे म्हणाले की, भीमाशी बेइमानी करण्यात शान नाही, करिता भीमवाटेवरून चालले पाहिजे. विद्या भारती म्हणाल्या रंजल्या गांजल्याचा दिन दाता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आमच्या जीवनाचे शिल्पकार आहेत. डॉ. कल्पना गंगावणे म्हणाल्या की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशनच्या कार्याला सहकार्य केले पाहिजे. डी. आर. गायकवाड म्हणाले की, भवतु सब्ब मंगलम ग्रुपच्या माध्यमातून विविध प्रकारचे कार्य सुरु आहेत. इंजिनीयर सुनील वाकळे म्हणाले की, बेरोजगारांसाठी कार्य झाले पाहिजे. डॉ. पूजा धनेगावकर म्हणाल्या की, धम्माचे कार्य गतिमान कडे पाहिजे. ॲड. डी. आय. माने म्हणाले की, दुःखाच्या कारणाचे नायनाट करा म्हणजे दुःख नष्ट होईल. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, धर्मात बंधने असतात तर धम्मात बंधन मुक्तता असते. शिकल्या सवरलेल्या माणसाने व्यवस्थेला समस्यानुसार प्रश्न विचारले पाहिजेत. सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशन व धनेगांवकर परिवाराच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. रमेशचंद्र धनेगावकर, बुद्ध पूजा धम्म मित्र रामहरी निकाळजे यांच्या हस्ते करण्यात आली. तर सूत्रसंचालन व आभार महादेव डांबरे यांनी केले. याप्रसंगी भाष्कर खरात, डॉ. भूषण धनेगांवकर, मधुकर सोनवणे, उत्तमराव राठोड, यशवंत खरात, राजेंद्र भिंगारे, चंद्रकांत मस्के, रमेश दाभाडे, बाबुराव वानखेडे, ज्ञानदेव गायकवाड, प्रा. दिनेश मगरे, ॲड. विलास मस्के, ॲड. डी. बी. मेश्राम, मायाताई दाभाडे, सोनल धनेगांवकर मॅडम यांचीही उपस्थिती लाभली.